# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**औसा (जि.लातूर) मतदारसंघातील संपादित जमिनीचा प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१) ४४४६७ (२२-०३-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) मतदारसंघातील पाझर तलाव व सिंचन तलावासाठी संपादित जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत मा.न्यायालयाचे आदेश असतांनाही बहुतांश शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबतची कार्यवाही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मौजे शिवणीलख ता.औसा येथील पाझर तलावासाठी संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत दिनांक १२ मे, २०१९ रोजीच्या शेतकऱ्यांच्यावतीने प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रधान सचिव,जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई यांना तपासून कार्यवाही करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये दिले आहेत हेही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त विधानसभा मतदारसंघातील पाझर तलावाच्या वाढीव मोबदल्याची किती प्रकरणे प्रलंबित व मोबदला वाटपास किती निधीची आवशकता आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निधी उपलब्ध करुन मा.न्यायालयाच्या आदेशानुसार संपादित जमिनीचा संपूर्ण मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२८-०२-२०२४) :** (१) अंशत: खरे

(२) सदरहू निवेदन जलसंपदा विभागाकडून या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि मा. विधानसभा सदस्य श्री. अभिमन्यू पवार यांनी मा. उपमुख्यमंत्री यांना दिनांक ८.१२.२०२२ रोजी दिलेले निवेदन प्राप्त झालेले आहे. पाझर तलाव मौ.शिवणीलख, ता.औसा, जिल्हा लातूरच्या भुसंपादनाकरिता रुपये १,२८,६३,२३८/- इतका निधी दिनांक १.०९.२०२३ च्या ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आला आहे.

(३) व (४) औसा विधानसभा मतदारसंघात पाझर तलावाच्या वाढीव मोबदल्याची रु.३,०९,६३,४०२/- ची एकूण २५ प्रकरणे सादर करण्यात आली असून लवकरच निधी वितरित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**नैसर्गिक आपत्तीच्या मदतीसाठी जुन्या निकषात बदल करून नवीन निकष व दर अंमलात आणण्याबाबत**

**(२) ५०३०८ (२७-०१-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक आपत्तीच्या काळात ओढवलेल्या संकटात केंद्र शासनाच्या दिनांक ८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार तसेच राज्याच्या महसूल व वन विभागाने केंद्र शासनाच्या निकषावर आधारीत दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधीत होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्यात येत असून हा शासन निर्णय सन २०१५ ते २०२० या कालावधीतपर्यंतच मर्यादीत होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२० नंतर वेळोवेळी वाढलेली महागाई, डिझेलच्या किंमती व अन्य दरवाढ दिवसेंदिवस होत असतांना सात वर्षापूर्वीचे (म्हणजे सन २०१५ मध्ये) आपादग्रस्तांना मदत देण्याबाबतचे निकष व दर कालबाह्य ठरले असतांना त्याच जुन्या निकष दरावर आधारीत मदत केली जात आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाचे कालबाह्य झालेले शासन निर्णय विचारात घेता, सदरचे निर्णय अद्ययावत करुन त्यानुसार आर्थिक मदत द्यावी अशी राज्यातील सर्व जनतेकडून तसेच मा. लोकप्रतिनिधींकडून मागणी केली जात असल्याचे दिनांक २० जुलै, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२० नंतर राज्यात आलेली नैसर्गिक आपत्ती लक्षात घेता जुने निकष व दर सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०५-०४-२०२४) :** (१) व (२) होय.
(३) व (४) केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती (SDRF / NDRF) निकषाच्या धरतीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या आपदग्रस्त व्यक्तींना सन २०२२-२३ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये द्यावयाच्या मदतीचे दर व निकष शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दिनांक २७.०३.२०२३ अन्वये निश्चित केले असून ते दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२२ पासून लागू केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एकल कलाकार व समूह संस्था निर्माते यांना विशेष अनुदान पॅकेज मंजूर करताना भजनी भारुड या समूह लोक पथकाचा अंतर्भाव केलेला नसल्यामुळे

**(३) ५२३७६ (२९-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एकल कलाकार व समूह संस्था निर्माते यांना विशेष अनुदान पॅकेज मंजूर करताना भजनी भारुड या समूह लोक पथकाचा अंतर्भाव केला नसल्यामुळे या पथकातील मालक व सहकलाकार या अनुदानापासून वंचित राहीले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या आदेशामध्ये अंश: बदल करून भजनी भारुड मंडळ या समूह लोककला पथकाचा समावेश करून नवीन शुद्धिपत्रक निर्गमित करण्याबाबत पुणे जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोककलाकारांच्या प्रश्नाबाबत विचार करून राज्य शासन सदर आदेशामध्ये भजनी भारुड समूह लोक पथकाचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रयोगात्मक कला प्रकारातील पात्र कलाकार व कलासमुह यांना अर्थसहाय्य करण्यास तसेच स्थानिक प्रयोगात्मक कलेतील कलाकारांच्या व संस्थांच्या निवडीशी संबंधित प्रशासकीय खर्चास दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य करण्याबाबतच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अटी व शर्तीमध्ये शिथिलता तसेच अंमलबजावणीची कालमर्यादा दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत वाढविण्यास दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता देण्यात आली होती.

राज्यातील ७३३५ एकल लाभार्थी तसेच, प्रयोगात्मक कलाप्रकारातील १०५ कला समुह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या शासन निर्णयान्वये, ३२० कला समूह व संस्थांना दिनांक २८ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये व १०८ कला समूह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये कोरोना पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये “विधी नाट्य” या प्रकाराचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये भजनी भारुड समूह लोक पथकाचा समावेश होतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या गडकिल्ल्यांची होणारी पडझड रोखण्याबाबत**

**(४) ५२५२५ (२९-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या गडकिल्ल्यांची होणारी पडझड रोखण्यासाठी शासनाच्या वतीने दुर्ग प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कालिदास कलामंदिर, नाशिक येथे राज्य पुरस्कार वितरण समारोह प्रसंगी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील माध्यमातून पर्यटनाला चालना देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी सांगितले परंतु पर्यटनस्थळांची गैरव्यवस्था, तसेच पर्यटकांसाठी निर्माण केलेल्या सोयी सुविधांची कमतरता, गैरसोय होत असल्याच्या तक्रारीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी गड किल्यांच्या संवर्धनासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे, अशी ग्वाही दिली आहे.

(२) गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्यस्तरीय व विभागीय गड संवर्धन समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच राज्य संरक्षित स्मारके विशेषत: किल्ले हे जतन संवर्धनाच्या चांगल्या अवस्थेत आणणे व त्यावरील पर्यटन सुविधांचा विकास करुन ही स्थळे लोकाभिमुख व जागतिक दर्जाची पर्यटन स्थळे व्हावीत, तसेच पर्यटन व सांस्कृतिक वारसा जतन या क्षेत्रात स्थानिक रोजगाराला चालना मिळावी, याकरीता खाजगी स्त्रोताद्वारे निधी उभारण्यासाठी महावारसा समिती स्थापन करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोकरबर्डी गावातील नागरिकांची काही गावे मध्यप्रदेश राज्यात समाविष्ठ करण्याबाबत**

**(५) ५६५६० (२८-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवर असलेल्या भोकरबर्डी गावाच्या वन तपासणी नाक्यावर भोकरबर्डी, धुळघाट,(जि.अमरावती) रवाररखेडा, बेरदा, बल्डा आणि चिंचघाट (जि.यवतमाळ)या पाच गावातील सरपंच व नागरीकांनी दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करून सदर गावे मध्ये प्रदेश राज्यात समाविष्ठ करण्याची मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सरपंच व नागरीकांनी अशी मागणी करण्याची मुख्य कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०३-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, यवतमाळ व अमरावती यांचे कार्यालयास कोणतेही निवेदन प्राप्त नसल्याचे जिल्हाधिकारी, यवतमाळ व अमरावती यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कलाकारांचा लोककला प्रवर्गात समावेश करुन शासनाच्या सर्व सवलती मिळण्याबाबत**

**(६) ६१७२१ (२१-०४-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तमाशा कलावंताना, वाघ्या-मुरळी, गोंधळी कलाकार वर्ग, तसेच बँड-बेन्जो पथक हे असंघटित वर्गामध्ये मोडणारा असल्याने तसेच प्रत्येक जिल्हयात सुमारास ३० ते ३५ हजार कलाकार असल्याने या कलाकारांचा लोककला प्रवर्गात समावेश करुन या कलावंताना शासनाच्या सर्व सवलती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) व (२) शासन सर्व संघटीत व असंघटीत लोककलावंत यांना राजर्षी शाहू मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजना, कलाकारांना म्हाडामध्ये २% आरक्षण प्रमाणपत्र, राज्यातील कलावंतांना परराज्यात कला सादरीकरण करण्यासाठी रेल्वे प्रवास सवलत मिळणेबाबत शिफारस पत्र, ११ वी प्रवेशासाठी कलावंत विद्यार्थ्यांना गुणांमध्ये सवलत, राज्यात तसेच परराज्यात शासनाने आयोजित केलेल्या महोत्सवात कला सादरीकरणाची संधी देत असते. वेगवेगळया राज्यात महाराष्ट्राची लोककला व संस्कृती सादर करण्यासाठी विविध पथक पाठवणे. तसेच, केंद्र मानधनासाठी पात्र लाभार्थ्यांची शिफारस शासनाकडून केली जाते.

तसेच, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ६ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात आले असुन राज्यातील असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी ३९ आभासी मंडळे स्थापन केली आहे. त्यामध्ये सदर शासन निर्णयातील परिशिष्ट १ मधील अनुक्रमांक १७ मध्ये करमणूक क्षेत्राशी निगडीत कामगार व कलाकार यांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाहीर कलावंताच्या विविध मागण्यांबाबत**

**(७) ६३५३० (२१-०४-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाहीर कलावंतांच्या शिष्टमंडळाने वृध्द कलावंतांच्या मानधनात वाढ, जिल्हा समितीमध्ये वर्षाला ३०० मानधन प्रकरणे घेणे, वार्षिक उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची मर्यादा २ लाख करावी, कोरोना काळात जाहीर करण्यात आलेले पॅकेज तात्काळ देण्यात यावे, वृध्द कलाकारांना सर्व आरोग्य सेवा मोफत मिळावी, शासनमान्य शिखर संस्था सभासद व राहत्या गावी घर बांधण्यास बॅकेतर्फे बिन व्याजी कर्ज अश्या विविध मागण्यांसाठी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सांस्कृतिक कार्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्याच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील शाहीर कलावंतांच्या विविध मागण्यांपैकी यािवभागाशी संबंधित कोरोना पॅकेज देण्याबाबत दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ आणि दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये रु.३५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, वृध्द कलावंतांच्या मानधनात वाढ, वार्षिक उत्पन्नाची मर्यादा वाढ या अनुषंगाने राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन योजनेमध्ये दिनांक १६ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच, सदर निवेदनातील इतर विभागांशी संबंधित मागण्यांबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना िदिनांक २२.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गावोगावी इंटरनेटच्या सुविधा वाढवण्यासाठी फोरजी सेवा उपलब्ध होण्याबाबत**

**(८) ६४०९४ (०२-०५-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गावोगावी इंटरनेटच्या सुविधा वाढवण्यासाठी माननीय प्रधानमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या डिजिटल इंडिया मोहिमेस वेग देण्याकरता राज्यातील २३८६ गावांमध्ये बीएसएनएलला मनोरे उभारण्यासाठी २६ मीटर जागा मोफत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०२२ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त गावांमध्ये फोरजी सेवा उपलब्ध होणार असून याचा लाभ निवडक गावांना होत असताना सदर योजना राज्यभरातील सर्व गावात राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

राज्यात गावोगावी इंटरनेटच्या सुविधा वाढविण्यासाठी भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) या केंद्रशासनाच्या संस्थेस दूरक्षेत्रातील गावांमध्ये दूरसंचार व इंटरनेट सेवा पुरविणे या सार्वजनिक प्रयोजनासाठी दिनांक २९.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये २३८६ गावांमध्ये तसेच, दिनांक ०५.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये २७५१ गावांमध्ये बीएसएनएलला मनोरे उभारण्यासाठी २०० चौ.मी. जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कुडे (ता.जि.पालघर) या गावातील शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(९) ६४६६१ (२७-०८-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुडे (ता.जि.पालघर) या गावातील वन जमिनीच्या विविध कामाचे नियोजन करण्यासाठी सन २०१९ या कालावधीपासून वन व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे बनावट इतिवृत्त व कागदपत्रे तयार केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात घेतलेल्या बैठकीत विद्यमान अध्यक्षाविनाच दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास संयुक्त वन व्यवस्थापन समितीने घेतलेले ठराव बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात स्थानिक भूमीहीन नागरिकांना शेती करुन उदरनिर्वाहासाठी दिलेल्या ‘वुडलैंड’ भूखंडाचे स्थान निश्चिती करण्यासाठी सन १९३२ या कालावधीत झालेल्या मोजणीचे गट बुक नकाशे व सर्वे अँड सेटलमेंट कार्यालय, ठाणे यांच्या नोंदीकडे भूमी अभिलेख व वन विभागांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे शेतकऱ्यांकडून सन १९६२ या कालावधीपासून वन विभागाने धारा वसूल असून धारा पावत्यावरही सर्वेक्षण क्र.१२३/७/१ असा स्पष्ट उल्लेख असतानाही सन २०२० या कालावधीत झालेल्या वन मोजणी दरम्यान भूमी अभिलेख विभागाने या आकार फोड पत्रकांमधील माहितीकडे दुर्लक्ष करुन वादग्रस्त भूखंड १२२ मध्ये असल्याचे दर्शवून वुडलैंड भूखंडाचे गट बुक नकाशे व प्रत्यक्षात झालेल्या मोजणीचे आकार जुळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या चुकीच्या सर्वेक्षण मोक्याच्या ठिकाणी जागा दर्शवून विकासकांना झुकते माप दिल्याचे आरोप वन संरक्षण समितीकडे समितीने केला असून चुकीच्या पद्धतीने झालेली मोजणी रद्द करुन संबंधितांची विभागीय चौकशी करुन कार्यवाही करण्याची मागणी कुडे गावातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंदर्भात वनविभाग प्रशासनाने कथित चुकीचे सर्वेक्षण व मूळ अभिलेखात खोट्या नोंदी करुन झालेली मोजणी रद्द करुन दोषी प्रतिवाद्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी संयुक्त वन व्यवस्थापन समितीने तसेच ‘समर्थन’ संस्थेने मा.उप मुख्यमंत्री, मा.मंत्री, (वने विभाग), महाराष्ट्र राज्य व प्रधान सचिव (वने विभाग), महाराष्ट्र शासन यांना लेखी निवेदनाद्वारे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याप्रकरणी शासनाने सदर संबंधित भूमी अभिलेख व वन विभाग प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करुन कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सदस्य सचिव हे वनपाल हे शासकिय कर्मचारी असतात. सचिव, संयुक्त वन व्यवस्थापन समिती, कुडे यांनी सादर केलेल्या त्यांचे अहवालात अशा प्रकारच्या बनावट इतिवृत्त व कागद पत्राच्या घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही

(२) हे खरे नाही, वरीलप्रमाणे..

(३) हे खरे नाही, सन १९३२ या कालावधीत झालेल्या वुडलँड भूखंडाचे मोजणीचे गटबुक नकाशे व सर्वे अँड सेटलमेंट कार्यालय, ठाणे यांनी तयार केले आहेत.

सदर अभिलेख उप अधीक्षक भूमि अभिलेख, पालघर यांचे अभिलेख कक्षात जतन करणेत आलेले असुन ते उपलब्ध आहेत. सदर आकारफोड पत्रक दिनांक २०/१२/१९३४ रोजीचे रिपोर्ट नुसार गांव वहिवाटीस रवाना केल्याची नोंद दाखल असुन सदरच्या नोंदीकडे भूमि अभिलेख विभागाचे कोणतेही दुर्लक्ष झालेले नाही

(४) हे खरे नाही,

सर्वेक्षण क्र. १२३/७/१ व स.न. १२२ मध्ये सन २०२० या कालावधीत कोणतीही वनमोजणी करण्यात आलेली

नाही. मोजणी करतेवेळी जुने मोजणी केलेले अभीलेख नकाशांच्या हद्दीत कोणताही बदल न करता मोजणीची पुढील कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे मोजणीचा आकार जुळत नसल्याचे म्हणणे खरे नाही.

मौजे कुडे येथील स.न. १२२ /अ या मिळकतीचे ७/१२ अधिकार अभिलेखानुसार दाखल धारकांचे कुलमुखत्यार पत्राद्वारे उप अधीक्षक भूमि अभिलेख, पालघर कार्यालयाकडून मोजणीची कार्यवाही करणेत आलेली आहे. सदर केलेली मोजणी स.न. १२२/अ पैकी करणेत आलेली आहे.

(५) हे अशंत: खरे आहे.

कुडे येथील स.न. १२२/अ या मिळकतीची मो.र.नं. ५४२/२०२१ अन्वये केलेली बिनशेती मोजणी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील दिनांक २०/८/२०२१ चे आदेशाने करणेत आलेली आहे. सदर मोजणी रद्द करणेबाबत कुडे येथील नारिकांनी मागणी केली आहे.

स.न.१२२/अ मधील ७/१२ अधिकार अभिलेखातील धारकांचे अनुमतीनुसार सदर मोजणी करणते आलेली आहे. त्यानुसार उप अधीक्षक भूमि अभिलेख, पालघर यांनी मौजे कुडे गावातील स.न. १२३/७ चे ७/१२ वरील अधिकार अभिलेखानुसार आवश्यक तर संबधित धारकाने मोजणी करुन हद्द निश्चीत करन घ्यावी या प्रमाणे कळविले आहे.

(६) हे खरे आहे.

श्री.रुपेश कीर, समर्थन प्रतिनिधी यांनी दिनांक २६/०५/२०२३ रोजी मा.मंत्री, वने , सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदन दिलेले आहे.

(७) यासंदर्भात जमाबंदी आयुक्त आणी संचालक भूमि अभिलेख, पुणे यांचेकडून दिनांक २५/०१/२०२४ च्या पत्रान्वये उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना मौजे कुडे येथील स.न.१२२ व १२३ बाबत केलेल्या मोजणीच्या कार्यवाहीची तपासणी करण्याकरीता इतर जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, उप अधीक्षक भूमि अभिलेख व शीरस्तेदार यांची तपासणी / चौकशी पथक त्यांचे स्तरावर गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात स्वतंत्र कृषी अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करण्याबाबत

**(१०) ६४६६६ (२४-०८-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील मध्यप्रदेश, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, राजस्थान आदी राज्यासह एकूण १० राज्यांमध्ये कृषी संचालनालय स्थापन करण्यात आले असून त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील स्वतंत्र कृषी अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सचिव तथा महासंचालक, कृषी संशोधन आणि शिक्षण, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय तथा भारतीय कृषी संशोधन परिषद, भारत सरकार यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना दिनांक २४ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास कृषी संचालनालय स्थापन करण्याकरिता सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने स्वतंत्र कृषी अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात कृषी आभियांत्रिकीचे स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्याची आवश्यकता तपासून यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इगतपुरी (जि. नाशिक) तालुक्यातील आदिवासी नागरिकांच्या जमिनीची फसवणूक केल्याबाबत

**(११) ६४६९६ (२५-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि. नाशिक) तालुक्यातील आदिवासी नागरिकांच्या जमिनी फसवणूक करून घेतल्या याप्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधीतांवर कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० एप्रिल, २०२३ व दिनांक १४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.महसूलमंत्री, तसेच जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक नाशिक यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधितावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

बिरसा ब्रिगेड आदिवासी बचाओ आंदोलन या सामाजिक संस्थेने दिनांक २ डिसेंबर २०२१ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे तक्रार केलेली आहे. मौजे भावली खुर्द ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील स. नं. १८१, १८२ क्षेत्र समारे ४.४ हेक्टर आर येथील मिळकतीमध्ये आदिवासी ते आदिवासी विक्री परवानगी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे आदेशान्वये देण्यात आलेली आहे व आदिवासी ते बिगर आदिवासी विक्री परवानगी शासनाचे पूर्व मान्यतेने जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे आदेशान्वये देण्यात आलेली आहे.

मौजे भावली खुर्द स. नं. ७२३, ८९/४, ४३८ मौजे जामुंडे ७४ अ, ७४ ब, ७४ क व ७४ ड आणि मौजे गावंडे स. नं. ३५/ब, मौजे चिचलेखर स. नं. १८९ मौजे वाघ्याची वाडी स. नं. १०, २४ व २०४, सदर गटांचे विक्री करीता जमीन मालकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक या कार्यालयाकडे अर्ज सादर करून विक्री परवानगी मिळणे करीता विनंती केलेली आहे. त्याअन्वये आदिवासी ते आदिवासी विक्री परवानगी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक या कार्यालयाचे आदेशान्वये देण्यात आलेले आहे व आदिवासी ते बिगर आदिवासी विक्री परवानगी शासनाचे पूर्व मान्यतेने जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे कार्यालयाचे आदेशान्वये देण्यात आलेली आहे.

मौजे पिंप्रीसदो स. नं. ४०६ मौजे तळेगाव स.नं. ३७१ व ३९८, या गटांमध्ये तहसिलदार इगतपुरी यांचेकडील अहवालानुसार कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण झालेले नाही.

मौजे वाळविहीर स.नं. १ अ सदर गटाचे विक्री करीता जमीन मालकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक या कार्यालयाकडे अर्ज सादर करून विक्री परवानगी मिळणे करीता विनंती केलेली आहे. त्यान्वये आदिवासी ते आदिवासी विक्री परवानगी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक या कार्यालयाचे आदेशान्वये देण्यात आलेले आहे व आदिवासी ते बिगर आदिवासी विक्री परवानगी शासनाचे पूर्व मान्यतेने जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे आदेशान्वये देण्यात आलेली आहे.

१ब,५७८, ६३०, ५९ एए, ५९६ब, ५५३ व ५७५ मौजे गव्हांडे १०७, ११८, १३०, १६५ व ४४ या गटांमध्ये तहसिलदार इगतपुरी यांचेकडील अहवालानुसार कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण झालेले नाही. मौजे गव्हांडे ग.नं. ६७ मध्ये आदिवासी ते आदिवासी विक्री परवानगी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक या कार्यालयाचे पुर्व परवानगीने देण्यात आली आहे.

याअन्वये उपरोक्त मिळकतीसंदर्भात कुठलाही प्रकारचे हस्तांतरण अथवा खरेदी / विक्री व्यवहार बळजबरी, फसवणुक याव्दारे झालेले नाही, असे अभिलेखावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे गैरव्यवहार झालेला नाही.

(२) वर नमुद मिळकतीबाबत चौकशी करण्यात आलेली असून गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास दिसुन येत नाही. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करणे ही बाब नाही.

(३ )प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील प्रलंबित सांस्कृतिक धोरणावर निर्णय घेण्याबाबत

**(१२) ६४९१९ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षांमध्ये राज्याला सांस्कृतिक धोरण असावे या उद्देशातून तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी माहे २००९ मध्ये जेष्ठ विचारवंत डॉ. आ.ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक धोरण समिती नियुक्त केली होती,तसेच या समितीने एक वर्ष अभ्यास करून शासनाला अहवाल सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, राज्यातील इतिहास, कला, साहित्य आणि सर्वच बाबतीत संपन्न वारसा भावी पिढीला कळावा व संस्कृतिचे जतन व्हावे यासाठी प्रलंबित असलेल्या सांस्कृतिक धोरणावर निर्णय घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) सदरील धोरणाच्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेण्यासाठी शासनाने दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित केलेली आहे. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य हे या समितीचे सन्माननीय अध्यक्ष असून श्री. विनय सहस्त्रबुध्दे हे या समितीचे सन्माननीय कार्याध्यक्ष आहेत. कारागिरी, भाषा, साहित्य आणि ग्रंथ व्यवहार, दृश्यकला, गड किल्ले, लोककला, संगीत, रंगभूमी, नृत्य, चित्रपट, भक्ती संस्कृती या विभागांकरिता पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी तसेच सदर धोरण समितीचे कामकाज व्यापक व परिणामकारक होण्यासाठी मूळ समितीला सहकार्य म्हणून दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपसमिती नेमण्यात आलेली आहे. सदर समितीचे कामकाज पूर्ण झालेले असून याबाबत अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## उजनी जलाशय (जि.सोलापूर) येथील पुनर्वसित भूखंडाबाबत

**(१३) ६७२५५ (२७-०८-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्याची वरदायनी असलेले उजनी जलाशयाच्या निर्मितीसाठी सन १९७५ मध्ये महाराष्ट्र शासनाने अनेक गावांचे पुनर्वसन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमीअभिलेख विभागाकडून प्रकल्पबाधीत धरणग्रस्तांना नवीन गावठाणात घरे बांधण्यासाठी भूखंडाचे वाटप करण्यात आले, नवीन गावठाणात प्राथमिक नागरी सुविधा देण्यासाठी गावठाणांचा ताबा शासनाने पुनर्वसन विभागाकडेच ठेवला आहे. मात्र अद्यापपर्यंत स्मशानभूमी, देवालये, वाडीवस्ती रस्ते, गावठाणातील रस्ते, वीज आदी सुविधा पुनर्वसन विभाग देऊ शकले नसून. पुनर्वसित गावठाणात अनेक भूखंडांवर महाराष्ट्र शासन अशी नोंद असून भूमीअभिलेख रेकॉर्डवर वेगळ्या नावाने नोंद तर पुनर्वसन कार्यालय भूखंड वाटप रजिस्टरला वेगळ्याच नावाच्या नोंदी पाहण्यास मिळत असून ग्रामपंचायत रेकॉर्ड नमुना नं.८ ला दुसरीच नोंद सापडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९८७ मध्ये भूमीअभिलेख विभागाने पुनर्वसित गावठाणांत सर्व्हे करुन भूखंडाचे मोजमाप केले, अनेक भूखंडांचे क्षेत्रफळ कमी-जास्त करुन चुकीच्या नोंदी लावण्यात आल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे अनेक दिवाणी न्यायालयीन वाद वर्षानुवर्षे सुरु आहेत. अनेक ठिकाणी शासकीय जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊन गावात

मंदिर असून पुनर्वसन कार्यालयात त्यांची नोंद नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय, तद्नुसार पुनर्वसित गावठाणातील भूखंडाच्या प्रश्नांसदर्भात शासनाने पुनर्वसन कार्यालय, भूमीअभिलेख कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय या तीनही स्तरांवर भूखंडाचे अभिलेखा एकत्रित करुन क्रमांक दुरुस्त करणे,सार्वजनिक प्रयोजनाकरिता आरक्षित भूखंडांचे पुनर्वसन विभागाकडून जे बोगस भूखंड वाटपाचे आदेश आले आहेत ते रद्द करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे .
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-०३-२०२४) :**
(१) होय, हे खरे आहे.
(२) सोलापूर जिल्ह्यातील पुनर्वसीत गावठाणांमध्ये वाटप केलेल्या भुखंडाच्या नोंदी करणेबाबत संबधित अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मंजुर नकाशाप्रमाणे गावठाणातील भूखंडनिहाय क्षेत्राची तपासणी करुन नोंद घेणेबाबत आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
तसेच बहुतांश पुनर्वसीत गावठाणांतील नागरी सुविधांची कामे पुर्ण झालेली आहेत.
(३) व (४) सन १९८७ मध्ये भुमी अभिलेख विभागाने सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील वांगी, चिखलठाण तसेच केतुर येथील पुनर्वसीत गावठाणाचा सर्व्हे करुन भूखंडाचे नगर भुमापन केलेले आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्त यांना भूखंडाचे वाटप केलेले असुन भूखंडाचे क्षेत्रफळ कमीजास्त केलेबाबत तक्रार प्राप्त नाही.
उजनी प्रकल्पातील पुनर्वसीत गावठाणात मंदीरासाठी राखीव जागा ठेवण्यात आली आहे. मात्र काही गावठाणांत ग्रामस्थांच्या सोयीनुसार राखीव भूखंडाऐवजी गावठाणातील इतर भूखंडावर मंदीरे असुन त्याबाबत नोंद घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
पुनर्वसीत गावठाणामधील अतिक्रमणबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने अतिक्रमण निष्काषीत करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सासन रामापुर (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील विकासाची कामे मंजूर करण्याबाबत**

**(१४) ६९४८४ (०३-०९-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सासन रामापुर (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथे ग्रामपंचायत ठराव क्रमांक सहा नुसार गावात कोळी महादेव जमातीचे लोक शंभर वर्षापासून राहतात असून महादेवाचे लग्न ही प्रथा दरवर्षी आनंदाने उत्साहात बारस सणाला साजरी करण्यात येत असल्याची प्रथा ऐतिहासीक व जुनी परंपरा आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आशयाचा ठराव घेऊन ग्रामपंचायतमधील इतिवुर्ता मध्ये नोंद घेण्यात आली असल्याने पुढे विभागाने नोंद घेणेसाठी या गावातील विकास कामावर निधि मंजुर करने व येथील पुरातन इतिहास संबंधी नोंद घेण्याबाबत अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त विकास अमरावती विभाग यांनी आदिवासी विकास मंत्री यांना त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ४२४/२०२३ दिनांक १२/०६/२०२३ रोजी पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन नोदं घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-०४-२०२४) :**

(१), (२) व (३) महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या अनुषंगाने ऐतिहासिक व जुनी प्रथा परंपरा व संस्कृतीचे जतन हा विषय पर्यटन व सांस्कृतिक कार्य या विभागाकडून हाताळण्यात येतो. तसेच सदर संस्कृती वा जुन्या प्रथेची नोंद राज्य दर्शनिका मध्ये घेतली जाते. सदर दोन्ही विषय पर्यटन व सांस्कृतिक विभागाशी संबंधित असल्याने उपायुक्त (विकास), अमरावती विभाग यांचेमार्फत प्राप्त निवेदन उचित कार्यवाहीस्तव पर्यटन व सांस्कृतिक विभागास दिनांक ३१/१०/२०२३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. तसेच सदर निवेदनातील विकास कामांवर योग्य ती कार्यवाही करण्यास्तव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,धारणी यांना दनिांक ३१/१०/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रा.टाकरखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील कोरोना काळात मृत्यू झालेल्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(१५) ७१४५५ (०४-०९-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा. टाकरखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील सेवाग्राम रूग्णालय येथे सन २०२१ मध्ये कोरोना काळात अर्चना सुनिल देशमुख या उपचार घेत होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपचारादरम्यान त्यांचा दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सेवाग्राम रूग्णालयात मृत्यु झाला, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना काळात मृत्यु पावलेल्या रूग्णांच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदतीची घोषणा केली आहे, त्यानुषंगाने अर्चना देशमुख यांचा कोरोना काळात मृत्यू झाला असतांना देखील त्यांना शासनाकडून कोणतीच आर्थिक मदत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यांचे नातेवाईकांना आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०५-०४-२०२४) :**

(१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) लागू होत नाही.

शासन निर्णय महसूल व वन विभाग, दिनांक २६/११/२०२१ अनव्ये कोविड-१९ मुळे मयत पावलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांना ५० हजार सानुग्रह अनुदान देण्यात येते, तथापी प्राथमिक आरोग्य केंद्र जळगाव ता. आर्वी यांचे MCCD प्रमाणपत्रामध्ये कोविड-१९ मुळे मृत्यु झाल्याचे नमूद नसल्यामुळे त्यांचा अर्ज जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण वर्धा यांचेकडून नामंजूर करणेत आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ज्येष्ठ कलावंताच्या मानधनाबाबत

**(१६) ७१६२१ (१०-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वृद्ध महिला, दिव्यांग कलावंत, मृदुंग वादक टाळकरी,कीर्तनकार ,ढोलकी वादक ,जागरण गोंधळी, साहित्यिक इत्यादी प्रकारात कलावंत म्हणून ओळख असलेल्या ५५ वर्षापुढील लाभार्थ्यांना दरमहा २२५० तर देशभरात काम केलेल्या कलावंतांना तीन हजार रुपये पर्यंतचे मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून कलावंत मानधन योजना कागदावरच थांबलेली असून लाभार्थी निवड समिती जिल्ह्यात दीड वर्षापासून नसल्याने सुमारे ७४३ ज्येष्ठ कलावंत मानधनाची प्रतीक्षा करीत असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कलावंत लाभार्थ्यांना त्यांचे मानधन न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१), (२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेंतर्गत ५० वर्षावरील पात्र लाभार्थ्यांना पुढील प्रमाणे मानधन दिले जाते.

| | |
|---|---|
| अ वर्ग कलावंत | रू. ३,१५०/- दरमहा |
| ब वर्ग कलावंत | रू. २,७००/- दरमहा |
| क वर्ग कलावंत | रू. २,२५०/- दरमहा |

आता, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.वृकमा ४३२१ (१५)/ प्र.क्र.१४५/सां.का.४, दिनांक १६ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये पूर्वी अस्तित्वात असणाऱ्या श्रेणीनिहाय कलाकार मानधनामध्ये वाढ करुन माहे एप्रिल, २०२४ पासून सर्व पात्र लाभार्थ्यांना दरमहा रुपये ५,०००/- इतके सरसकट एकच श्रेणी मानधन करण्यात आलेले आहे. तसेच, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी निवड समिती नियुक्त करण्यात आली आहे.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या अखत्यारितील सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे अहमदनगर जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या पात्र लाभार्थ्यांना इष्टांकानुसार खालीलप्रमाणे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अ.क्र. वर्ष निवड कलावंत संख्या सद्यस्थिती

१) २०२१-२०२२ १०० माहे एप्रिल, २०२२ पासून मानधन सुरु करण्यात आले आहे

२) २०२२-२०२३ १०० माहे सप्टेंबर, २०२३ पासून मानधन सुरु करण्यात आले आहे

३) २०२३-२०२४ १०० दिनांक १ एप्रिल, २०२४ पासून मानधन सुरु करण्यात येईल

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मळेवाड, तळवणे व कोंडुरा (ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) या गावांना चिरेखाणी, खाणकामामुळे मातीचा उपसा करुन मोठ्या प्रमाणात ढिगारा केल्याबाबत

**(१७) ७१८३७ (११-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळेवाड, तळवणे व कोंडुरा (ता.सावंतवाडी, जि सिंधुदूर्ग) या तीन गावांत चिरेखाणी, खाणकामामुळे मोठया प्रमाणात मातीचा उपसा करून ढिगारा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ढिगारा कोसळण्याची परिस्थिती निर्माण झाली असल्याने तेथील ग्रामस्थांनी तहसिलदार, सावंतवाडी यांच्याकडे तक्रार केल्यानंतर तहसिलदारांनी संरक्षण भींत उभारण्याचे निर्देश खाणकाम करणाऱ्या कंपनीला दिले असतानाही, त्याकडे सदरहू कंपनी दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त गावातील मातीचा ढिगारा एखादया डोंगराप्रमाणे मोठा झाला असून रायगड जिल्हयातील ईशाळवाडीत दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास दरड कोसळून जशी दुर्घटना घडली तशी या गावांतही दुर्घटना घडण्याबाबत तहसिलदार, सावंतवाडी यांच्याकडे तक्रार करूनही कोणतीच कारवाई झालेली नाही, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१),(२) व (३)

मौजे मळेवाड, तळवणे व कोडुरा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग या गावात चिरेखणी या खाण कामामुळे मोठ्या प्रमाणात मातीचा उपसा करून ढिगारा करण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. मात्र मौजे तळवणे, ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग येथील गट नं.२७,२८,२९ब इतर मधील क्षेत्रावर मे. मिनरल्स ॲन्ड मेटल्स, मुंबई यांना लोह या खनिजासाठी खाणपट्टा मंजुर करण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या स्थळपाहणी नुसार सदर कंपनीने प्रोसेसिंग केलेल्या मातीचा साठा ग.नं.२९ मध्ये केलेला असुन सदर माती back filling करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. तसेच ढिगाच्या भोवती संरक्षक भिंत घालण्यात आली असुन, माती वाहून जाणार नाही यासाठी ढिगावर झाडे लावण्यात आली आहेत. सदर खाण ही कोंडुरा गावापासून ०२.०० किमी अंतरावर असल्याने लोकवस्तीस कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्याची शक्यता नसल्याचे नमुद केले आहे.

श्री. विजयकुमार श्रीरंग यादव यांनी आपले सरकार पोर्टलवर तहसिलदार, सावंतवाडी यांना तक्रार प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने तहसिलदार यांनी संरक्षक भिंत उभारणे व अन्य प्रकारच्या उपायोजना करण्याबाबत व भविष्यात मातीचे डोंगर कोसळून पुण्यातील माळीन गावासारखी दुर्घटना घडणार नाही यासाठी कंपनीला संरक्षक भिंत उभारणेसाठी संबंधित कंपनिस सूचना देण्याबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिनांक ३०.०५.२०२३ यांना सूचित केले होते. परंतु त्यापुर्वीच जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ०८.०५.२०२३ अन्वये खनिपट्ट्यामधुन पावसाच्या पाण्यामुळे तसेच पाण्याच्या साठ्यामुळे आपत्तीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये याकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.
(४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**कोकणातील घरांचे सनद देण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(१८) ७१८५२ (०८-०२-२०२४). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील मच्छीमार समाजाच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी त्यांच्या गावठाण परिसिमेतील घरांचे महास्वामित्व अभियानअंतर्गत ड्रोन सर्व्हेद्वारे भूमापन करून त्यांना मिळकत पत्रिका व सनद देण्याचे काम प्रगतीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामाची सद्यस्थिती काय आहे, कितीजणांना मिळकत पत्रिका व सनद देण्यात आली आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोकण विभागात सिंधुदूर्ग, पालघर, ठाणे, रायगड व रत्नागिरी या जिल्हयात महास्वामित्व अभियानांतर्गत ड्रोन सर्व्हेद्वारे गावठाण भूमापनाचे काम करण्यात येत आहे. ठाणे-२,पालघर -४१, रायगड- ८४ व रत्नागिरी- २१ असे एकुण १४८ गावांमध्ये मच्छीमार बांधवांच्या मिळकती आढळून आल्या आहेत. त्यापैकी पालघर-८०५, रायगड-९६१,रत्नागिरी-६२८ अशा एकुण २३९४ मच्छीमार बांधवांना सनद वाटप करणेत आल्या आहेत. उर्वरीत मच्छीमार

बांधवांना कालबद्ध कार्यक्रमानुसार सनदा वाटप करणेची व मिळकतपत्रिका digitalsatbara.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील ३३ आदिवासी वाड्यांवरील वयोवृद्ध नागरिक खेकडे, मुठे, मासे व रानभाज्या विकून उदरनिर्वाह करत असल्याबाबत

**(१९) ७११९२० (०८-०२-२०२४). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील माळशेज घाटा लगतच्या ३३ आदिवासी वाड्यांवरील शेकडो महिला व पुरुष मजूर आजही पावसाळ्यात घाटमाथ्यावर शेतीच्या कामावर जातात, तर वयोवृद्ध नागरिक खेकडे, मुठे, मासे व रानभाज्या विकून उदरनिर्वाह करतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी वस्त्यांवरील वाढती बेरोजगारी, दारिद्र्य व कुपोषण असल्याने उपासमार थांबविण्याकरीता खावटी वाटप योजना सुरु करण्याची मागणी आदिवासी क्रांतीसेनेने माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू योजना सुरु करुन त्याचा लाभ आदिवासी बांधवांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२९-०२-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) आदिवासी लाभार्थ्यांकरिता खावटी कर्ज योजना सुरु करण्याकरिता प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयातील रेतीघाट ताब्यात घेण्याबाबत

**(२०) ७२१०८ (०८-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील रेती घाटावरुन रेतीच्या वाहतूकीचा करार दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास संपला असून घाटमालकांनी तेव्हापासून रेतीचा प्रतिब्रास रेट ४ हजारावरुन ६ हजार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घाटमालकांनी रेतीच्या किमंती वाढवूनही स्थानिक प्रशासनाचे त्यावर कोणतेही नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पंचनामे करुन घाट ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१),(२) व (३)

चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२२-२०२३ करीता वाळु/रेती निर्गती धोरण शासन निर्णय दिनांक २८.०१.२०२२ नुसार केलेल्या लिलावात एकूण ३८ रेतीघाट लिलावात विक्रीस गेले. शासन निर्णयानुसार रेती घाटातुन रेती काढण्याचे मुदत दिनांक १०.०६.२०२३ पर्यंत होती तर रेतीसाठ्यावरून रेतीची उचल व विक्री करण्याची मुदत दिनांक ३०.०९.२०२३ पर्यंत होती. सद्यस्थितीत म्हणजेच दिनांक ०१.१०.२०२३ पासून रेतीघाट बंद करण्यात आले आहेत.

रेतीघाट मालकांनी रेतीचा प्रतिब्रास दर ४ हजारा वरून ६ हजार केला असल्याबाबत अधिकृत निवेदन व तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेली नाही

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### अमरावती येथील जिजाऊ बँकेच्या संचालकाने ग्राहकाच्या खात्यातून लाखो रुपये काढल्याबाबत

**(२१) ७२१०९ (११-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील जिजाऊ कमर्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेच्या मध्यवर्ती शाखेतून एका विद्यमान संचालकाने ग्राहकांच्या खात्यातून परस्पर ३४ लाखांची रक्कम काढल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदर बँकेच्या या संचालकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, अमरावती यांनी माहे सप्टेंबर २०२१ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत संचालकांच्या बँक खात्याची तपासणी केली असता बँकेच्या मध्यवर्ती शाखेतून विद्यमान संचालकांनी ग्राहकांच्या खात्यातून परस्पर ३४ लाख रुपये काढल्याचे दिसून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयातील वयोवृध्द कलाकारांचे मानधनाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२२) ७२२८४ (०९-०२-२०२४). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील ४०० हून अधिक वयोवृध्द कलाकारांचे मानधनाचे प्रस्ताव गत ३ वर्षांपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व कलाकार मानधनापासून वंचित राहिले असल्याचे, हे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी त्यांच्याकडे प्राप्त प्रलंबित ४७७ प्रस्तावांची छाननी करुन एकूण परिपूर्ण व पात्र १८१ कलावंतांचे प्रस्ताव सांस्कृतिक कार्य संचालनालयास सादर केले आहेत. संचालनालयामार्फत सदर पात्र १८१ कलावंतांच्या खात्यात दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी मानधन जमा करण्यात आले असून, सदर पात्र लाभार्थ्यांना नियमितपणे मानधन सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यात पशुवैद्यकीय सेवांवरचे शुल्क माफ करण्याबाबत**

**(२३) ७२३५० (१०-०२-२०२४). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यात पशुवैद्यकीय सेवा व इतर विविध सेवांसाठी सेवाशुल्कात वाढ करण्यात आल्याने पशुपालक व शेतक-यांना परवडत नसल्याने सेवाशुल्क माफ करावे, अशी मागणी ब्लू क्रॉस वेल्फेअर फॉउडेशन यांनी शासनाकडे केल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दूधाचे दर वाढत नसून पशुवैद्यकीय सेवेचे दर मात्र सरकारने वाढवल्याने शेतकरी हवालदिल झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दूधाला मिळणारा कमी भाव, वाढलेल्या पशुखाद्य किमंती व वाढता औषधोपचार यामुळे पशुपालक अक्षरश: मेटाकुटीला आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील सर्व पशुवैद्यकीय रुग्णालयातील सेवा रुग्णालयाप्रमाणे नि:शुल्क अथवा कमी दर करुन सर्व पशुपालकांना सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक २३.०५.२०२२ अन्वये पशुवैद्यकीय दवाखान्यांमधून दिल्या जाणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांसाठी आकारण्यात येणारे सेवाशुल्क हे प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत अतिशय नाममात्र आहे.
राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्याच्या दुधाला रू. ५/- प्रति लिटर अनुदान देण्याचा निर्णय दिनांक ०५.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर अनुदान हे शेतकऱ्याच्या वैयक्तिक बँक खात्यावर थेट (DBT) वर्ग केले जाणार आहे / जात आहे.

---

### अकोला जिल्ह्यात पोकरा योजनेंतर्गत मिळालेली अवजारे गायब असल्याबाबत

**(२४) ७२६४३ (१०-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात पोकरा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या गटांना शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातून मिळालेली अवजारे चौकशी समितीला आढळून न आल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्प्यात समाविष्ट असलेल्या अकोला जिल्ह्याव्यतिरिक्त आणखी १५ जिल्ह्यांमध्ये किती ठिकाणी असे प्रकार निदर्शनास आले आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी ज्या शेतकरी गटांकडे पोकरा योजनेतील अवजारे आढळून आलेली नाहीत, त्यांच्याकडून अवजारे खरेदी करण्यासाठी दिलेली रक्कम वसूल करण्याबाबत तसेच या सर्व प्रकरणांमध्ये दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यात लाभ दिलेल्या २१२ अवजारे बँकांपैकी २४ शेतकरी गट/कंपनी यांच्याकडे अवजारे आढळलेली नाहीत.

(२) अकोला जिल्ह्याव्यतिरिक्त छत्रपती संभाजीनगर-१९, जालना-८, नांदेड-१, हिंगोली-१०, तसेच अमरावती-१ जिल्ह्यांतील अवजार बँकांमध्ये काही अवजारे आढळून आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रकल्प संचालक (आत्मा), अकोला यांनी संबंधित अवजारे कमी आढळलेल्या ११५ शेतकरी गटांना वसुलीच्या नोटीसा बजावून खुलासे मागविले होते. खुलाश्याच्या अनुषंगाने ११५ शेतकरी उत्पादक कंपनी/ गट यांची क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत पुर्नतपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३ गट/कंपन्यांकडे एकही औजार आढळून आले नाही व २१ गट/कंपनीकडे मंजुरीपेक्षा कमी औजारे आढळून आली आहेत. एकही औजार न आढळलेल्या ३ गट/कंपन्यांकडून दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ अखेर रु.१२,४५,९६०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित वसुलीची प्रक्रिया सुरु आहे. अकोला जिल्हयातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शिस्तभंगविषयक प्रस्ताव आयुक्त कृषि यांना सादर केला असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तसेच अकोला जिल्ह्याव्यतिरिक्त औजारे न आढळलेल्या छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जालना, नांदेड तसेच अमरावती जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना संबंधित प्रकल्प संचालक (आत्मा), यांनी नोटीस बजावून विहित मुदतीत अवजारांची पुर्नतपासणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) अशी बाब नाही.

---

### एरंडोल (जि.जळगाव) तालुक्यातील गिरणा नदी काठावरून वाळूचा उपसा करणाऱ्या टोळयांना तहसीलदारांनी केलेल्या कारवाईबाबत

**(२५) ७२८३७ (०८-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल (जि.जळगाव) तालुक्यातील गिरणा नदी काठावरून तराफ्याच्या साहाय्याने वाळूचा उपसा करणाऱ्या टोळयांना तहसीलदारांनी सहकाऱ्यांसह आणि सरपंच व ग्रामस्थांनी घेराव घालून ३ तरफी ताब्यात घेतले असल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने वाळूचा उपसा करणाऱ्या टोळयावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०४-२०२४) :** (१), (२) व (३)

एरंडोल (जि.जळगाव) तालुक्यातील गिरणा नदी काठावरून ताराफ्याच्या साहाय्याने वाळूचा उपसा करण्यासाठी वापरण्यात येणा-या ३ निनावी तराफी तहसिलदार, एरंडोल यांनी ताब्यात घेऊन ग्रामस्थांच्या समक्ष नष्ट केल्या आहेत.

जळगाव जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.तसेच, अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणा-यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची तसेच, हद्दपारीची कार्यवाही करण्यात येते.

जळगाव जिल्ह्यात दिनांक ०१.०४.२०२३ ते दिनांक ३१.१०.२०२३ या कालावधीत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या ५६६ प्रकरणी ७६२.०५ लक्ष दंडाची अकारणी करण्यात येऊन ८० गुन्हे दाखल केले आहेत.

---

### मौजे राजुरा (जि.चंद्रपूर) येथील राजुरा रि-पाईप कंपनीला दिलेली जमीन शासनास जमा करण्याबाबत

**(२६) ७२९९७ (१०-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजुरा (जि.चंद्रपूर) येथील सर्व्हे क्र. १४९ या सरकारी गायरान जमिनीपैकी १० एकर जमीन राजुरा रि फॅक्टरीज ॲड प्रा.लि. कंपनीला सन १९७०-७५ मध्ये वा त्यादरम्यान औद्योगिक वापराकरिता लीजवर देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीवर मागील २० ते २५ वर्षापासून औद्योगिक वापर होत नसुन कंपनी मालकाने सरकारी जमिनीची परस्पर एका खाजगी व्यक्तीला विक्री केली असून शासनाच्या जमिनीचा गैरवापर होत असल्याने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०३-२०२४) :** (१) होय,

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) राजुरा रि फॅक्टरीज अँड प्रा.लि.या कंपनीला औद्योगिक प्रयोजनार्थ दिलेली जमीन सद्यस्थितीत पडीत असल्यामुळे प्रकरणात शर्तभंग झाल्याने सदर जागा शासन जमा करण्याबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी,राजुरा यांचेकडून जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांना प्राप्त झाला असून, तद्नुषंगाने पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महसूल विभागाने १०० व ५०० रुपयांचे स्टॅम्प पेपर व्यवहारातून बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(२७) ७३०१७ (०८-०२-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल विभागाने १०० व ५०० रुपयांचे स्टॅम्प पेपर व्यवहारातून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यातील हजारो मुद्रांक विक्रेत्यांसमोर बेरोजगारीचा प्रश्न उभा राहून त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त किंमतीचे मुद्रांक बाद न करता पुर्वीप्रमाणे कायमस्वरुपी ठेवण्यात याव्या अशी मागणी शासकीय परवानाधारक मुद्रांक विक्रेते अर्ज व दस्त लेखक संघटनानी वारंवार शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे, काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
शासनाकडून यासंबंधी कोणताही शासन निर्णय किंवा आदेश निर्गमित केलेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) रु.१००/- आणि रु.५००/- चे मुद्रांक पेपर सद्यस्थितीमध्ये व्यवहारामध्ये चालू असून विक्रीही परवानाधारक मुद्रांक विक्रेते यांच्यामार्फत सुरळीत सुरू आहे. त्यामुळे शासन स्तरावरुन रु. १००/- व रु. ५००/- चे स्टॅम्प पेपर बंद करण्याचा कोणताही निर्णय प्रस्तावित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बँकर्स कमिटीने शेतकऱ्यांना कर्ज वाटपाचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत**

**(२८) ७३४८२ (११-०२-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यस्तरीय बँकर्स कमिटीने (एसएलबीसी) यंदाच्या खरिपात राज्यातील ५४ लाख २३ हजार शेतकऱ्यांना ५१ हजार ६३७ कोटीच्या कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले व बदलत्या हवामानामुळे बहुतेक बँकांनी कर्ज वाटप बंद केल्याने सुमारे १८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना कर्जच न मिळाल्याने शेतकरी वंचित राहिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण न केल्याने लाखो शेतकऱ्यांना दिनांक १ एप्रिल ते ३१ ऑगस्ट या काळात खाजगी सावकारांकडे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार बँकर्स कमिटीने शेतकऱ्यांना कर्ज वाटपाचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) राज्य स्तरीय बॅंकर्स समितीमार्फत सन २०२३-२४ मध्ये राज्यासाठी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक रु. ७२,३४७ कोटी इतका आहे. यापैकी खरीप हंगामासाठी रु. ५१,५६५ कोटी व रब्बी हंगामासाठी रु. रु.२०,७८२ कोटी इतका लक्षांक देण्यात आला आहे.

त्यानुसार राज्यातील सर्व बॅंकांनी खरीप हंगाम अखेर दिनांक ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत ४२.०४ लाख शेतकऱ्यांना रु. ४१,२२१ कोटी इतक्या रकमेचे कर्जवाटप केले आहे (लक्षांकाच्या ८० टक्के). तसेच राज्यातील सर्व बॅंकांनी रब्बी लक्षांकापैकी
ि दिनांक ३१ जानेवारी २०२४ अखेर एकुण ७.४० लाख शेतकऱ्यांना रु. ९८३९ कोटी रकमेचे वाटप केले असुन रब्बी हंगामाचे कर्जवाटप अजुनही सुरु आहे. जिल्हा प्रशासनाकडून पीककर्ज वाटपाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील बदलते वातावरण व अतिवृष्टीमुळे होणारे भूस्खलन आणि डोंगर खचण्याचे प्रकार रोखण्यासाठी तयार केलेल्या आराखडयाबाबत**

**(२९) ७३५९७ (०९-०२-२०२४). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील बदलते वातावरण, उद्‌भवणारी वादळे, नैसर्गिक आपत्ती आणि अतिवृष्टी यामुळे वाढते भूस्खलन आणि डोंगर खचण्याचे प्रकार रोखण्यासाठी १० हजार कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आराखड्याचे स्वरुप काय आहे, तसेच त्यामध्ये कोणकोणत्या जिल्ह्यातील तालुक्यातील गावे घेण्यात आली आहे व त्याची अंमलबजावणी कधीपर्यत होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१९-०४-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत दिनांक १०.११.२०२१ च्या शासन निर्णयाव्दारे कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रकल्पासाठी राज्य मंत्रीमंडळाने ३२०० कोटी रूपयांचा निधी मंजुर केला आहे. यामध्ये भूमिगत विद्युत वाहिनी, धुप/खार प्रतिबंधात्मक बंधारे, बहुउद्देशिय निवारा केंद्रे व दरड प्रतिबंधात्मक कामांचा समावेश आहे.

(२) कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत खालील जिल्हे व तालुके यांचा समावेश होतो.

१) रत्नागिरी - रत्नागिरी,दापोली, खेड, राजापूर, संगमेश्वर, मंडणगड.

२) रायगड – पोलादपूर, महाड, पेण, अलिबाग, मुरुड, रोहा, म्हसाळा, रायगड, वैभववाडी, श्रीवर्धन, माणगाव, उरण, तळा.

३) सिंधुदूर्ग – दोडामार्ग, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, देवगड, कुडाळ, आचरा.

४) ठाणे- ठाणे, मिरा- भाईंदर, भिवंडी,उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

५)पालघर – डहाणु, तलासरी, पालघर, वसई.

कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत समाविष्ट कामांना दिनांक १०.११.२०२१ च्या शासन निर्णयाव्दारे मंजुरी देण्यात आली आहे व याबाबतचे प्रशासकीय मान्यतेचे शासन निर्णय दिनांक १९.०१.२०२४ ते ०५.०३.२०२४ या कालावधीत निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातून कोल्हापूर जिल्ह्यात ऊस तोड मजूरांसाठी काळजी केंद्र उभारण्याबाबत**

**(३०) ७३६७९ (१४-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील १९१ गावातून १,९७९ कुटूंबे कोल्हापूर जिल्ह्यातील ११ सहकारी साखर कारखान्यांचा ऊस तोडण्यासाठी सन २०२२ मध्ये ऊस तोडणी गाळप हंगामात ऊस तोड मजूरांची १,९०३ लहान मुले ऊसाच्या फडात व ऊसात झोपली असल्याचे कोल्हापूरच्या अवनी संस्थेच्या सर्वेक्षणातून माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदरच्या मुलांसाठी काळजी केंद्र उभारणे व सात वर्षावरील मुलांना शाळेत दाखल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२४) :** (१) होय.
(२) कोल्हापूर विभागामध्ये सहकारी साखर कारखान्यांमार्फत बालकांना कारखाना कार्यक्षेत्रात असलेल्या शाळेत दाखल करून त्यांना शिक्षण देण्यात येते.

सदर बालकांसाठी ऊसतोड हंगामामध्ये हंगामी साखर शाळा सुरू करणेत येवून मानधन तत्त्वावर अर्हताधारक शिक्षकांची नियुक्ती केली जाते.तसेच बालकांना प्रोत्साहनपर शालेय आहार/मध्यान्हभोजन, बिस्कीटे इ. पदार्थ व गणवेष पुरविला जातो. अशाप्रकारे कारखान्यावरील ऊसतोड मजूरांच्या बालकांना शैक्षणिक प्रवाहामध्ये आणले जाते. तथापि ऊस तोडणी मजुरांसाठी काळजी केंद्र उभारणे व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देणे याबाबतची कार्यवाही लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळमार्फत करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली येथे शंकरराव पुजारी नुतन नागरी सहकारी बँक इचलकरंजी या बँकेत झालेला गैरव्यवहार**

**(३१) ७३७०७ (११-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील शंकरराव पुजारी नुतन नागरी सहकारी बँक, इचलकरंजी या बँकेच्या संचालक मंडळाने व इतरांनी पदाचा दुरुपयोग करुन नियमबाह्य कर्ज वितरित केल्यामुळे रुपये ३.५८ कोटी रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात गुन्हे दाखल करुनही तपास अपूर्ण अवस्थेत असल्याने तपास पूर्ण करुन ठेवीदारांची रक्कम परत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०३-२०२४) :**
(१) होय. हे खरे आहे.

शंकरराव पुजारी नुतन नागरी सहकारी बँक, इचलकरंजी या बँकेच्या सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालामध्ये बँकेचे चेअरमन व त्यांच्या पत्नी व कर्मचारी असे एकुण १९ व्यक्तींनी रुपये ३.५८ कोटी रुपयांचा गैरकारभार व गैरव्यवहार केला असल्याचे निर्देशनास आले आहे. वैधानिक लेखापरिक्षक यांनी दिनांक १०.०८.२०२० रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ अन्वये संबंधितांविरुध्द इचलकरंजी पोलिस ठाणे, इचलकरंजी येथे एफ.आय.आर क्र.०२८५ दाखल केली आहे.
(२) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक १३.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये सदर बँकेवर आर्थीक निर्बंध लागू केले आहेत. त्यानंतर प्रशासक यांनी ४६०९ ठेवीदारांची रु.४१.६० कोटी इतकी रक्कम अदा केली आहे. दिनांक

०४.१२.२०२३ रोजी बँक अवसायनात गेल्यानंतर उर्वरित १०,७९४ ठेवीदारांचे व्याजासहित रु.२०.३५ कोटीचे क्लेम डीआयसीजीसी यांचेकडे सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.
३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोणार ( जि.बुलढाणा) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये औषधांचा निर्माण झालेला तुटवडा**

**(३२) ७३७४० (०८-०२-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याने पशुपालकांना जनावरांसाठी आवश्यक असलेल्या औषधांकरीता भटकंती करावी लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील दवाखान्यात वेळेचे कोणतेही बंधन नसल्यामुळे कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्यामुळे शेतक-यांना परत जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दवाखान्यात आवश्यक तो औषधांचा पुरवठा तसेच कर्मचा-यांच्या उपस्थिती संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) लोणार, तालुक्यातील पशुधनाची संख्या विचारात घेवून आवश्यक त्या औषधांचा पुरवठा करण्यात आला असून, औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता अशी स्थिती नाही.

---

**कृषी विभागाच्या धर्तीवर राज्यातील मत्स्य व्यावसायिकांचा विकास साधण्याबाबत**

**(३३) ७३९३६ (१०-०२-२०२४). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी विभागाच्या धर्तीवर राज्यातील मत्स्य व्यावसायिकांचा विकास साधण्यासाठी या क्षेत्रात पूरक व्यवसाय करणाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी शासन कोणकोणते नावीन्यपूर्ण कार्यक्रम आखत आहे,
(२) असल्यास, आत्तापर्यंत किती व्यक्तींना व सामूहिक व्यावसायिकांना व्यक्तिगत, सामूहिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले वा येणार आहे,
(३) असल्यास, अशा प्रकारचे प्रोत्साहन वा पुरस्कार देण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना देखील गौरविण्याचा शासनाचा कार्यक्रम आहे काय,
(४) असल्यास, याबाबत मच्छीमार बांधवांमध्ये समाजामध्ये जाणीव जागृती व व्यवसायिकरण निर्माण व्हावे, हा उद्देश साध्य होण्यासाठी पुरस्काराबरोबर स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे काय,
(५) असल्यास, त्यामध्ये सागरी, निमखारे पाणी व भूजलशयीन मत्स्योउद्योग असे गट केले जाणार आहेत काय, तसेच या पुरस्काराचे स्वरुप काय असणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०२४) :** (१) कृषी विभागाच्या धर्तीवर राज्यातील मत्स्य व्यावसायिकांचा विकास साधण्यासाठी या क्षेत्रात पूरक व्यवसाय करणाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी शासनामाफ्रत घर-घर किसान कार्ड (KCC) अभियान, सागर परिक्रमा, जिल्हा स्तरावर कृषी महोत्सवामध्ये कार्यशाळा व प्रदर्शने, Agrovision, सर्व जिल्हा स्तरावर जागतिक मत्स्य दिनाच्या दिवशी प्रशिक्षण, कार्यशाळा व प्रदर्शने, महामत्स्य

अभियान कार्यक्रम आखण्यात आले आहे. तसेच मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील उत्कृष्ट/उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना व्यक्तिगत व सामुहिक पुरस्कार कार्यक्रम प्रस्तावित आहे

(२) महामत्स्य अभियान अंतर्गत एकूण ६ व्यक्तींना व सामूहिक व्यावसायिकांना व्यक्तिगत, सामूहिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच सदर क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मत्स्य रत्न व मत्स्य भूषण पुरस्कार प्रस्तावित आहेत.

(३) होय. मत्स्यव्यवसाय विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या उल्लेखनिय कामगिरी करिता मत्स्य रत्न व मत्स्य भूषण पुरस्कार प्रस्तावित आहेत.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील जिल्हाधिकारी यांनी सर्व शासकीय कार्यालयाची केलेल्या तपासणीबाबत**

**(३४) ७४१६९ (०९-०२-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी येलो (yelo) मोझॅकग्रस्त शेतक-यांच्या शेताची पाहणी, कोराडी प्रकल्प, मस्य बीज केंद्राला भेट, मेहकर ग्रामीण रुग्णालयासह सर्व शासकीय कार्यालयाची झाडाझडती घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाहणीत कोणकोणत्या त्रूटी आढळून आल्या आहेत,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०३-२०२४) :** (१) जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी दिनांक १४.१०.२०२३ रोजी मेहकर तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी देवून संबधित कार्यालय प्रमुख यांना आवश्यक सूचना दिल्या.

(२) मेहकर तालुक्यात विविध शासकीय प्रकल्प, रुग्णालय व वस्तीगृह यांनी नियमित कामाचा भाग म्हणुन भेटी दिल्या. यलो (yelo) मोझकमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करणे, पिण्याच्या पाण्याचे आरक्षण करणे, मत्स्य बिज संवर्धनासाठी कार्यवाही करणे बाबत संबधितांना आवश्यक ते निर्देश दिले, मेहकर येथील रुग्णालयामध्ये पुरेशा औषधीसाठ्याची खात्री करणे, रुग्णालय परिसर व रुग्णकक्ष इ. ठिकाणी साफसफाई करणे, हिवरा आश्रम येथील रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी शासन स्तरावरुन मंजुर झालेली साधन सामुग्री प्राप्त करुन घेणे, डॉक्टरची रिक्त असलेल्या पदावर नियुक्ती करणे, नविन ट्रामा सेन्टर कार्यान्वीत करण्यासाठी आरोग्य संचालनालयाकडुन पदे निर्माण करुन घेणे इ.बाबत सुचित करण्यात आल्या. नविन शासकीय धान्या गोदाम बांधकाम पूर्ण करुन ताब्यात घेणेबाबत तहसीलदार मेहकर यांना सुचना देण्यात आल्या. शासकीय वस्तीगृहाची दुरुस्ती व इतर शासकीय कार्यालयच्या इमारतीचे आवश्यक असलेल्या दुरुस्तीची कामे करणे इ. बाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सुचना देण्यात आल्या.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) निरंक

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात जहाजांमुळे मच्छीमारांच्या जाळ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(३५) ७४१९७ (०८-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील दांडी आणि वायरी येथील भारतीय नौसेना दिनाच्या पार्श्वभूमीवर सर्व्हेसाठी आलेल्या जहाजांमुळे येथील पारंपारिक मच्छीमारांच्या जाळयांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हे दिवसा करण्यात येणार असतांही रात्रीचे जहाज फिरत असल्याने मच्छीमारांच्या जाळयाचे नुकसान झाल्याने नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी मच्छीमारांनी संबंधित मस्त्य विभागाच्या कार्यालयाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नुकसानग्रस्त मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

नौका मालक यांचे उदरनिर्वाहाचे साधन असणारी जाळी तुटून गेल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाल्याने सदर नौका मालक यांना अर्थसहाय्य मिळणेकरिता सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, सिंधुदूर्ग कार्यालयाकडून प्रस्ताव जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग कार्यालयास पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील आद्यकवी संत मुकदराजस्वामी समाधी मंदिर परिसरातील कामांना "वन पर्यटन" योजनेतून मंजुरी देण्याबाबत

**(३६) ७४२९४ (१३-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील आद्यकवी संत मुकदराजस्वामी समाधी मंदिर येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिर परिसरात पर्यटक, भाविक भक्तांना विविध सुविधा निर्माण करुन देण्यासाठी "वन पर्यटन" योजनेतून एकूण १७ कामांना मंजुरी देऊन निधी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व निवेदनानुसार किती रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी अंबाजोगाई (जि.बीड) येथील आद्यकवी संत मुकदराजस्वामी समाधी मंदिर भोवताली असलेल्या वन विभागाच्या जागेत येणाऱ्या भक्तांना विविध सुविधा निर्माण करुन देण्यासाठी वन पर्यटन आराखड्यामध्ये कामे प्रस्तावित करुन निधी मागणी करणेबाबत विभागीय वन अधिकारी, बीड वन विभाग यांना सूचित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एस.टी. बँकेच्या एमडी पदी नियमबाह्य पद्धतीने अधिकाऱ्याची नियुक्ती केल्याबाबत**

**(३७) ७५००० (१३-०२-२०२४). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी. बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक वा मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर पात्र उमेदवारांना निवडण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नियम आखून दिल्यानुसार उमेदवार पदवीधर असणे, नियुक्तीच्या वेळी त्याचे वय ३५ वर्षा पेक्षा कमी वा ७० वर्षा पेक्षा अधिक नसावे, मध्यम वा वरिष्ठ स्तरावरील आठ वर्षांच्या कामाचा अनुभव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरम्यान कंत्राटी तत्त्वावर व्यवस्थापकीय संचालक या पदावर कोणतेही अनुभव नसलेले २२ वर्षी श्री.सौरभ पाटील यांची नियुक्ती केली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेने एम.डी. पदासाठी काढलेल्या जाहिरातीमध्ये उमेदवाराचे वय २१ वर्षापेक्षा अधिक, इंजिनिअरिंग, एमबीए (फायनान्स) तर अनुभवाची अट शिथिल करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात २२ वर्षीय तरुणाची एम.डी. पदावर नियुक्ती करणे संकल्पिक नसून ही नियुक्ती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमांचे उल्लंघन करीत असून, नवनियुक्त एमडी तज्ञ संचालकांच्या जवळचे नातेवाईक असल्याचा आरोप माजी केंद्रीय वित्त राज्यमंत्री यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या नियमबाह्य नियुक्ती केल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) सहकार आयुक्त व निबंधक यांनी दिनांक २७/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ चे आदेशान्वये श्री. सौरभ पाटील हे त्या पदासाठी निश्चित केलेली पात्रता धारण करीत नसल्यामुळे, त्यांची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात यावी व व्यवस्थापकीय संचालकाचे पद त्वरित विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात यावे याबाबत बँकेस निर्देश दिले असून श्री. सौरभ पाटील यांनी दिनांक १३.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राजीनामा दिलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ अ चे कलम (३) मधील दोन्ही परंतुके वगळण्याबाबत**

**(३८) ७५०३० (१३-०२-२०२४). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ अअअ चे कलम (३) मधील दोन्ही परंतुके वगळण्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात उद्भवलेल्या नैसर्गिक आणिबाणीच्या परिस्थितीमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणे शक्य नसल्याने शासनाने कलम ७३ अअअ (३) या कलमामध्ये २ परंतूकांचा समावेश करुन अशी तरतूद केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिस्थितीनुसार सदर परंतुकाचा वापर करुन काही सहकारी संस्थांच्या निवडणुका न घेता, त्या संस्थेवरील पूर्णपणे सहकार कायदा, ढाचा व मुलतत्त्वांच्या विपरित असून ही परिस्थिती अशीच सुरु राहिली तर सहकार चळवळीचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ अअअ चे कलम (३) मधील दोन्ही परंतुके वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२१-०३-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक १२ ऑक्टोबर,२०२० व दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिनियमान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३अअअ मधील, पोट-कलम (३) मध्ये परंतुक दाखल करण्यात आले आहे.
(३) व (४) दिनांक ०७ जून, २०२३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिनियमान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, मधील कलम ७३अअअ मधील पोट-कलम (३) मध्ये, पहिल्या परंतुकामधील, "कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे" हा मजकूर वगळण्यात आला असल्याने सहकार चळवळीचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात एनसीडीसी योजना चुकीच्या पध्दतीने राबवली जात असल्याबाबत**

**(३९) ७५२२३ (०९-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने मच्छीमार समाजाला आर्थिक बळ मिळवून समाज मुख्य प्रवाहात यावा याकरीता एनसीडीसी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजना चुकीच्या पध्दतीने राबवली जात असल्यामुळे व अनेक जाचक अटीमुळे राज्यातील नवे मच्छीमार या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेतील जाचक अटी काढून योजनेचे पुनरुज्जीवन करण्यात यावे, अशी मागणी अनेक मच्छीमार संघटनांकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे चिंचखेड, डिग्रस बु. (ता.देऊळगांवराजा) येथील जप्त केलेला रेती साठा चोरीला गेल्याबाबत**

**(४०) ७५३५५ (०९-०२-२०२४). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)मौजे चिंचखेड, डिग्रस बु. (ता.देऊळगांवराजा) येथे शासकीय जमीनीवर रेतीसाठा उपलब्ध असल्याने तलाठी, चिंचखेड व डिग्रस बु यांचा पंचनामा केला असता त्याठीकाणी रेती असल्याचे सिद्ध झाले असून सदर रेतीसाठयाची तांत्रीक मोजमाप करण्यासाठी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देउळगावराजा त्यांनी दिनांक २६ जुलै, २०२३ रोजीच्या पत्राचा अहवाल सादर केला असता त्यामध्ये तांत्रिक मोजमापानुसार स्मशानभुमी परीसर येथे १३.५० ब्रास व मौजे डिग्रस बु येथे गट नं ४३१, ४३२ येथे ११७.५२ ब्रास रेतीसाठा असल्याबाबत असा एकूण १३१.०२ ब्रास रेतीसाठा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांनी जप्त रेतीसाठा नियमानुसार जाहीर करण्याबाबत तहसीलदार देऊळगाव राजा कार्यालयास प्राधीकृत केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रेतीसाठा श्री. बाजाजी सहकारी सुतगिरणी मर्यादीत, शासन अर्थ सहाय्य असल्याने आणि सदर सुत गिरणीचे बांधकाम सुरु असून रेती वाहतूक धोरण निश्चित झाले नसल्याने सुत गिरणीचे बांधकाम प्रलंबित राहु नये याकरीता श्री बाजाजी सहकारी सूत गिरणी तर्फे मागणी केली असता सूतगिरणीकडून गौण खनिज रक्कम भरून घेतल्यानंतर रेती उचल करण्यासाठी गेले असता रेतीसाठा खूपच कमी भरला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत चौकशी करून नायब तहसीलदार देऊळगाव राजा आणि उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांच्यावर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१) होय हे खरे आहे

(२),(३),(४),(५) व (६)

तहसिलदार, देऊळगाव यांनी दिनांक २६.०७.२०२३ अन्वये जप्त वाळूसाठी हर्रास करण्याची परवानगी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना मागणी केली असता, जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी दिनांक ०२.०८.२०२३ अन्वये उपविभागीय अधिकारी यांना सदर वाळू/रेती हर्रास करण्यास परवानगी दिली. तदनंतर तहसिलदार, देऊळगाव राजा यांनी दिनांक २३.०८.२०२३ च्या पत्रान्वये मौजे डिग्रस बु. येथील ५० ब्रास रेतीसाठा अज्ञात व्यक्तीने उचल केला असुन मौजे चिंचखेड येथील १३.५० ब्रास व डिग्रस बु. येथील ६७ ब्रास असा एकूण ८०.५० ब्रास चा साठा श्री बाजाजी सहकारी सुतगिरणी मर्यादित देऊळगाव राजा यांच्याकडून संपूर्ण रक्कम भरून त्यांच्या नावे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असता, त्यास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १८.०९.२०२३ अन्वये मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे मौज डिग्रस येथे कमी भरलेल्या साठ्याबाबत अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी उपविभागीय अधिकारी, देऊळगाव राजा व तहसिलदार, देऊळगाव राजा यांना निर्देश दिले आहेत.

या प्रकरणी दोषी अधिकारी यांचेकडे कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२.०९.२०२३ रोजी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना पत्र दिले असता, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी संबंधित नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांचे विरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, देऊळगांव राजा यांना निर्देश दिले आहेत.

---

## पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) वन कार्यालयावर आदिवासी समाज बांधवांनी इकोपार्कच्या मुद्यासह इतर काही मागण्यांसाठी केलेल्या आंदोलनाबाबत

**(४१) ७५४८७ (११-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) वन कार्यालय येथे आदिवासी बांधवांनी आदिवासी संस्कृतीची अवहेलनाच्या मुद्यासह इतर काही मागण्यांसाठी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास इकोपार्क येथे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) आंदोलनात मागणी केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली व त्यानुषंगाने गाव पातळीवरील समित्यांकडून तसे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे आंदोलकांसोबत झालेल्या चर्चेमध्ये ठरविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती शहरातील राधानगर ते करोरा मार्ग या वस्तीमधून वाहणाऱ्या नाल्याला संरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(४२) ७५८१५ (११-०२-२०२४). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) अमरावती शहरातील राधानगरी ते करोरा मार्ग या वस्तीमधून वाहणाऱ्या नाल्यामुळे अतिवृष्टीत त्याभागातील नागरिकांना दरवर्षी त्रास सहन करावा लागत असून स्थानिकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नाल्याला संरक्षण भिंत बांधण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोक प्रतिनिधींनी सातत्याने पुनर्वसन विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाला पुनर्वसन विभागाने मंजुरी दिली आहे काय व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२९-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत पूर संरक्षण भिंतीचे रक्कम रुपये ४०.०० कोटीचा प्रस्ताव दिनांक १२.०१.२०२४ रोजीच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाच्या ठरावासह शासनास सादर केला आहे.

सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असुन प्रस्तावावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयामध्ये अवैध्यरित्या मातीचे उत्खनन केल्याबाबत

**(४३) ७६११४ (१०-०२-२०२४). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयामध्ये मुंबई-बडोदा महामार्गाच्या भरावासाठी साखरे धरणातील गाळ वापरण्याची परवानगी प्रशासनाने ठेकेदार मोटे कार्लो या कंपनीला दिली असतांना सदर कंपनीने धरणातील गाळ काढण्याऐवजी डहाणू तालुक्यातील शेतक-यांच्या जमिनी, डोंगर व टेकडया पोखरुन माती उत्खनन केले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठेकेदारांनी प्रशासनाने उत्खनन केल्याच्या निषेधार्थ डहाणूवासियांनी काम बंद करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयावर मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी ठेकेदारांविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१),(२),(३) व (४)

मृद व जलसंधारण विभागाने केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रायसामार्फत राबविण्यात येत असलेल्या महामार्ग विकास कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली माती/मुरूम/दगड या करीता जलसंधारणाच्या उपचारांची सांगड घालण्याबाबत दिनांक २९.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णय व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग, पालघर यांचा दिनांक ०८.०६.२०२२ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केलेला अहवाल विचारात घेऊन जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०२.०५.२०२३ च्या आदेशान्वये साखरे धरणातील बुडीत क्षेत्रात उत्खनन करण्यासाठी संबंधित कंपनीस परवानगी दिलेली आहे.

साखरे धरण व्यतिरिक्त संबंधित कंपनीस डहाणु तालुक्यातील एकूण १० खाजगी मालकीच्या जमिनीमधुन एकूण ७४,००० ब्रास गौण खनिज उत्खनन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

कष्टकरी संघटना, मल्यान, डहाणु रोड यांनी दिनांक ०४.१०.२०२३ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन उपविभाग, वाणगाव येथील कार्यालयावर मोर्चा काढला होता

ग्रामपंचायत, साखरे यांनी दिनांक २५.०९.२०२३ रोजीची तक्रार व कष्टकरी संघटना यांचे दिनांक १२.१०.२०२३ रोजीचे निवेदन दिले. त्यानुषंगाने झालेल्या चौकशीत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यस्थापन विभाग, पालघर यांनी दिनांक ०७.११.२०२३ रोजी सादर केलेला अहवाल विचारात घेवून, अपर जिल्हाधिकरी, पालघर यांनी संबंधित कंपनीस दिनांक ०२.०५.२०२३ रोजी दिलेला परवाना आदेश दिनांक ०७.११.२०२३ अन्वये रद्द केला आहे.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील तुषार व ठीबक सिंचन खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या अनुदानाबाबत

**(४४) ७६५२१ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये तुषार व ठीबक सिंचन खरेदी केलेल्या ४३६ शेतकऱ्यांचे जवळपास ६३ लक्ष ९५ हजार रुपयांचे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील पंधरा महिन्यापासून अनुदान थकल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्यामुळे शेतकऱ्यांना त्वरित अनुदान उपलब्ध करुन देऊन वाटप करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०२२-२३ मध्ये सदर योजनेंतर्गत अंबेजोगाई तालुक्यातील ९८७ शेतकरी अनुदानास पात्र असून ८८४ शेतकऱ्यांना रु.१३४.०९ लक्ष अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा केले आहेत. उर्वरित १०३ शेतकऱ्यांचे रु.१३.५१ लक्ष अनुदान प्रलंबित असून केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर ते अदा करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत**

**(४५) ७७२६७ (०९-०२-२०२४). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण विश्वाचे ऊर्जा स्त्रोत व प्रेरणादायी असून त्यांचे गड किल्ले संवर्धन करणे गरजेचे असून याबाबत दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिवरायांनी वापरलेली वाघ नखे शासनाने काही काळासाठी परत आणली आहेत ते कायमस्वरूपी परत घ्यावीत तसेच छत्रपती शिवरायांनी वापरलेली भवानी तलवार आणण्यासाठी शासनाने कार्यवाही केली नाही , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गड किल्ल्यांना पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावे यासाठी निधी देणे अपेक्षित असताना आवश्यक तो निधी दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्राचा धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व सामाजिक वारसा जपण्यासाठी खास बाब म्हणून गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार गड किल्ल्यांचे संवर्धन व त्यांचा इतिहास सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन करणे आवश्यक असल्याने त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०३-२०२४) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे नाही.
छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील वाघनखे तीन वर्षाकरीता प्रदर्शनास देण्यासाठी महाराष्ट्र शासन व व्हिक्टोरीया ॲण्ड अल्बर्ट म्युझियम यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. भवानी तलवार सद्यस्थितीत सातारा येथील जलमंदिर या वाड्यात आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची इंग्लंडमधील कोणत्याही सार्वजनिक वस्तुसंग्रहालयात नसून बकिंगहम पॅलेस मधील थेट ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या अखत्यारीतील सेंट जेम्स पॅलेस मधील "रॉयल कलेक्शन ट्रस्ट" येथे आहे व शीर्षस्थ परवानगी शिवाय ती बघता येत नाही. याबाबत संबधित संस्थेशी पत्रव्यवहार सुरू आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सर्वसामान्य जनतेसाठी वारसास्थळांच्या व कलाकृतीचे ऐतिहासिक व स्थापत्यकला महत्व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये वारसास्थळ सहल (हेरीटेज वॉक), फिरते संग्रहालय, स्वच्छता मोहीम, प्रदर्शन, माहितीपट, राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम इ. आयोजन केले जाते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आंबवडे (ता.भोर, जि.पुणे) येथील कान्होजी जेधे व जिवा महाले यांच्या समाधीस्थळांचा जिर्णोध्दार करण्याबाबत**

**(४६) ७७३६८ (०९-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंबवडे (ता.भोर, जि.पुणे) येथे शुरवीर कान्होजी जेधे व जिमा महाले समाधीस्थळे असून सदर ऐतिहासिक समाधीस्थळे पाहण्यास राज्यातून अनेक पर्यटक येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समाधीस्थळे अत्यंत दुरवस्थेत असल्याने या समाधीस्थळांचा जिर्णोध्दार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समधीस्थळांचा जिर्णोध्दार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०३-२०२४) :** (१)हे खरे आहे.

(२) ही बाब निदर्शनास आली आहे.

(३) प्रश्नाधिन दोन्ही समाधीस्थळे सुस्थितीत असून किरकोळ जतन दुरुस्तीची आवश्यकता आहे. याबाबत पुरातत्व विभागास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गावच्या, नगरच्या किंवा शहराच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आतील क्षेत्रातील अकृषक आकारणी भरलेल्या तुकड्यांची खरेदी-विक्री करण्याबाबत**

**(४७) ७७४२६ (०९-०२-२०२४). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावच्या, नगरच्या किंवा शहराच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आतील क्षेत्रातील जनतेस अकृषिक वापराची अधिक सुलभ करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाहीमध्ये सुधारणा करून अकृषक आकारणी भरलेल्या तुकड्यांची खरेदी-विक्री करण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याबाबत महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकृषक आकारणी भरलेल्या तुकड्यांची खरेदी-विक्री करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०३-२०२४) :**(१)होय हे खरे आहे.

(२)व (३) होय. हे खरे आहे.

अकृषक आकारणी भरलेल्या तुकडयांची खरेदी- विक्री करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील मच्छीमार व खलाशी यांच्या कुटुंबियांना उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(४८) ७७४२८ (१०-०२-२०२४). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पाकिस्तानच्या कैदेतील मच्छीमार व खलाशी यांच्या कुटुंबियांना उदरनिर्वाहासाठी दररोज ३०० रुपये मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाकिस्तानातून पालघर जिल्ह्यात परतलेले ११ आणि पाकिस्तान कैदेत असलेले १९ मच्छिमार कुटुंबिय आजही मदतीच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मच्छिमार व खलाशी यांच्या कुटुंबियांना तातडीने मदत मिळावी अशी मागणी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमार व खलाशी यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०२४) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्यातील नौका नजरचुकीने पाकिस्तान देशाच्या सागरी हद्दीमध्ये गेल्यास पकडल्या गेलेल्या खलाशी/मच्छीमारांच्या निराधार कुटुंबांना उदरनिर्वाहासाठी प्रतिदिन रू.३००/- याप्रमाणे आर्थिक सहाय्य देण्याबाबत दिनांक २/०८/२०२३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

या विभागाच्या शासन निर्णय, दिनांक २/०८/२०२३ मधील अट क्र.१ मध्ये संबंधित मच्छीमार/खलाशी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे तसेच त्यांचेकडे महाराष्ट्र राज्याचा मासेमारी परवाना असावा अशी अट नमूद आहे. पाकिस्तानमध्ये पकडलेले मच्छिमार हे महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असून आदिवासी समाजाचे आहेत व क्रियाशील मच्छीमार आहेत. परंतु सदर मच्छिमारांकडे मासेमारी परवाना नसल्याने त्यांच्या कुटुंबियांना सदर योजनेचा लाभ देणे शक्य होत नाही. तथापि, शासन निर्णय दिनांक २/०८/२०२३ मधील अटी व संलग्न कागदपत्रांची पूर्तता होणाऱ्या पाकिस्तानच्या कैदेत असलेल्या मच्छीमारांच्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जव्हार (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी क्षेत्रातील विकास कामे पूर्ण करुनही देयक प्रलंबित ठेवल्याबाबत**

**(४९) ७७४५० (१३-०२-२०२४). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी विकास विभागातील सन २०१५-१६ मध्ये ठक्कर बाप्पा आदिवासी जिल्हास्तर योजनेतून मंजूर केलेली “आदिवासी विकास प्रकल्प” अंतर्गत आदिवासी क्षेत्रातील प्रस्तावित ७ विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांचेमार्फत सन २०१६-१७ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ७ मंजूर कामांची आदिवासी विकास विभाग, प्रकल्प अधिकारी व निरिक्षक तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांनी पाहणी करुन काम पूर्ण केल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांना पाच वर्षे उलटूनही संबंधित विकासकाला देयके देण्याबाबत आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांनी देयके अदा करण्याबाबत वारंवार

पत्रव्यवहार करुनही संबंधित विभागांचे अधिकाऱ्यांनी विलंब केल्यामुळे उक्त विकासकांना काम मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामे पूर्ण झाल्याबाबत संयुक्त पाहणी करुनही सदर कंत्राटदारास देयके देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी आदिवासी विकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू विकासकाला संबंधित अधिकारी यांनी देयके अदा न करता प्रलंबित ठेवल्याप्रकरणी ती देयके व्याजासहित देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-०४-२०२४) :** (१), (२) खरे नाही.
(३), (४) व (५) खरे नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) येथे वन विभागाचे विश्रामगृह नव्याने निर्माण करण्याबाबत

**(५०) ७७६४३ (१३-०२-२०२४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथे वन विभागाचे विश्रामगृह नव्याने निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उप वनसंरक्षक यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वन विभागाचे विश्रामगृह नव्याने निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तिवसा हे गाव अमरावती वन विभागाचे कार्यकक्षेत येते. अमरावती वन विभागांतर्गत वडाळी व मोर्शी येथे वन विश्रामगृह आहेत. सदर गावांपासून तिवसा गावाचे अंतर ४० कि.मी. चे आत आहे. तसेच तिवसा गावालगत वन विभागाच्या अखत्यारीत कमी वनक्षेत्र असल्यामुळे तिवसा येथे वन विश्रामगृह बांधण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.